महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक:- १२७९/१०　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक :- २० मार्च, २०२३

प्रसिद्धीपत्रक

**'म्हाडा'ने पुणे, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांतील गृहनिर्माण योजनांना गती द्यावी** - उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

म्हाडा पुणे मंडळातर्फे ३१२० सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत

मुंबई, दि. २० मार्च, २०२३ : वाढत्या शहरीकरणामुळे शहरांमध्ये परवडणाऱ्या दरातील घरांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) माध्यमातून परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत आहे. येत्या काळात सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी शासन प्रयत्नशील असून पुणे, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांतील म्हाडाच्या गृहनिर्माण योजनांना गती द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे २० टक्के सर्वसमावेशक योजना व प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत पुणे, पिंपरी चिंचवड शहरातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३१२० सदनिकांच्या ऑनलाईन सोडतीचा शुभारंभ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आला. त्यावेळी श्री. फडणवीस बोलत होते.

यावेळी पुण्याचे पालकमंत्री श्री. चंद्रकांत पाटील, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती वल्सा नायर सिंह, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, पुणे मंडळाचे मुख्याधिकारी श्री. नितीन माने- पाटील, देखरेख समिती अध्यक्ष श्री. एम. एम. पोतदार, उपायुक्त श्री. दीपक नलावडे, समिती सदस्य श्री. धनंजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अन्न, वस्त्र याबरोबरच निवारा आवश्यक आहे. त्यासाठी शहरी भागात नागरिक येतात. त्यांना माफक आणि परवडणाऱ्या किंमतीत घर उपलब्ध करून देताना किमान सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी 'म्हाडा'ने आपल्या प्रकल्पांना गती द्यावी. तसेच बांधकामाची गुणवत्ता अधिक उत्तम

करण्याची दक्षता घ्यावी. अधिकाधिक घरे उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाने नियोजन करीत लवकरात लवकर घरांच्या सोडती काढाव्यात, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

पुणे मंडळाने आज काढलेल्या ३१२० सदनिकांच्या सोडतीसाठी ५५,८४५ अर्ज प्राप्त झाले. आज काढण्यात आलेल्या सोडतीत २० टक्के सर्व समावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत २४८३, प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत ६३७ सदनिकांचा समावेश होता. तसेच २९३८ सदनिका या प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील असल्याने संगणकीय सोडतीत त्यांचा समावेश करण्यात आला नाही. तसेच म्हाड कायद्यातील तरतुदींनुसार प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या तत्त्वावरील सदनिकांच्या खरेदीसाठी पात्रतेचे निकषही शिथिल करण्यात आले होते. म्हाडाने तयार केलेल्या IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management system) या नूतन संगणकीय प्रणालीचा सर्वप्रथम वापर पुणे मंडळाने सर्वात केला आहे.

सदर सोडतीचा निकाल https://mhada.gov.in व https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळांवरही जाहीर केला जाणार आहे.

###

(हेमंत पाटील)
जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण



